# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( शिक्षण विभाग )

**जा. क्र. /क्यू/शि.वि./2014** **दि. 19/12/2014**

**परीपत्रक**

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर

**विषय :– 14 ते 20 डिसेंबर 2014 हा कालावधी उर्जा संबर्धन आठवडा म्हणून साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :– कार्यकारी अभियंता (विद्यूत) म.न.पा., नागपूर यांचे पत्र क्र. एल.डी./का.अ./9723 दि. 17/12/2014.**

संदर्भीय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण महाराष्ट्र शासन या संस्थेतर्फे राष्ट्रीय पातळीवर व राज्य पातळीवर दि. 14 डिसेंबर ते 20डिसेंबर 2014 हा कालावधी उर्जा संवर्धन आठवडा म्हणून दरवर्षी साजरा करावयाचा आहे. या अंतर्गत आपल्या शाळेत उर्जा संवर्धन विषयाअंतर्गत निबंध, चित्रकला स्पर्धा आयोजित करून तसा अहवाल कार्यालयाला सादर करावा. सोबतच उर्जा बचतीची प्रतिज्ञा रोज प्रार्थनेच्या वेळेत विद्यार्थ्यांकडून वदवून घ्यावी.

## उर्जा बचतीची प्रतिज्ञा

- वीज बचत करणे हे माझे राष्ट्रीय कर्तव्य आहे.
- मी वीज बचतीसाठी अवश्य प्रयत्न करीन.
- मी माझ्या शाळेत, ज्या ज्या ठिकाणी विनाकारण वीज खर्च होत असेल त्या त्या ठिकाणी विजेचे स्विच बंद करीन.
- मी विद्यूत उपकरणाचा आवश्यक तेवढाच वापर करेन.
- विजेची टयूबलाईट, पंपे, विद्यूत उपकरणे आवश्यकता नसेल तेव्हा बंद करीन.
- मी माझ्या घरात, परिसरात वीज बचतीसाठी नेहमी प्रयत्नशील राहीन.
- मी घरात पाणी तापविण्यासाठी हिटर, विद्यूत शेगडी ऐवजी सौर उर्जेवरील उपकरणे यांचा वापर करीन.
- मी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करेन, ज्यामुळे इंधन बचत होईल.
- मी विद्यूत उपकरणांची वारंवार देखभाल करेन.
- मी अपारंपारिक उर्जा उपकरणाचा वापर करेन. उदा. सी.एफ.एल., स्टार लेबल रेफ्रिजरेटर इ.
- अशाप्रकारे वीज बचतीसारखे राष्ट्रीय अभियान यशस्वी करण्याची मी आज प्रतिज्ञा करीत आहे.

शिक्षणाधिकारी,
**नागपूर महानगरपालिका नागपूर**

**प्रतिलीपी :–**

1) मा. उपायुक्त, म.न.पा. नागपूर.
2) कार्यकारी अभियंता (विद्यूत) म.न.पा., नागपूर

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc